# मानसेवी वैदयकिय अधिकारी पदाकरिता तात्पुरत्या नेमणूकीची जाहिरात

## पुणे जिल्हा परिषद, पुणे

## आरोग्य विभाग,

पुणे जिल्हयातील आदिवासी भागात भरारी पथक भोरगिरी , प्रा.आ. केंद्र डेहणे तालुका खेड व भरारी पथक ढाकाळे , प्रा.आ. केंद्र डिंभा तालुका आंबेगाव येथे नेमणूकीच्या दिनांकापासून ११ महीन्या पर्यंत मानसेवी वैदयकिय अधिकारी पदाची नेमणूक करणेसाठी जिल्हा आरोग्य अधिकारी, पुणे जिल्हा परिषद पुणे यांचे कार्यालयाकडून दिनांक 3/१/२०२५ रोजी सकाळी.११. वाजता थेट मुलाखती (वॉक इन इन्टरव्यु) घेण्यात घेणार आहेत. त्याकरिता आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता, वय व इतर अटी यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**मुलाखतीसाठी येताना आवश्यक असलेली मुळ कागदपत्रे व झेरॉक्स प्रती घेवून हजर रहावे.**

१. बी.ए.एम.एस. व महाराष्ट्र मेडीकल कौन्सीलचे मोंदणी प्रमाणपत्र आवश्यक.

२. वयोमर्यादा उमदचाराचे वय ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे तथापी अनुभवी वैदयकिय व्यावसायिकांची वयोमर्यादेची अट पाच वर्षापर्यन्त शिथील केले जाईल.

३. मानधन- नियुक्त केलेल्या उमेदवारास दरमहा एन. एच. एम. यांचेडून रक्कम रु १८०००/- व आदिवासी विकास विभागाकडून रक्कम रु २२०००/- असे एकूण रु. ४००००/- (अक्षरी रक्कम रु.चाळीस हजार मात्र) मानधन देण्यात घेईल.

**अ) अटी व शर्ती**

अ) सदरची नियुक्ती हि नेमणूकीच्या दिनांकापासून ११ महीने कालावधीसाठी असून निवड केलेल्या उमेदवाराला नेमणूकीच्या ठिकाणी वास्तव्य करुन आरोग्य सेवा दयावी लागेल.

ब) कोणत्याही स्वरुपाची रजा देय नाही.

क) मुलाखतीस उमेदवारांना स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.

ड) हि पदे राज्यशासनाची पदे नसून निव्वळ कंत्राटी स्वरुपातील पदे आहेत.

इ) निवड झालेल्या उमेदवारास रु ५००/- च्या बॉन्ड पेपरवर अटी व शर्तीबाबत हमीपत्र लिहून दयावे लागेल.

ई) अर्जदाराने अर्ज ए-४ आकाराच्या कागदावर करावयाचा असून त्यामध्ये खालील बाबी अंतर्भुत कराव्यात.

**ब) उमेदवाराची सर्वसाधारण माहिती:-**

१) ठळक अक्षरात स्वतःचे नांवः-

२) अर्जदाराचे संपुर्ण पत्ता, दुरध्वनी क्रमांक / भ्रमणध्वनी क्रमांक (अनिवार्य)

३) कामाचा अनुभव काम केलेली संस्था व कालावधी.

४) शैक्षणिक अर्हतेचा संपूर्ण तपशिल अभ्यासक्रमाचे नाव, संस्था, विदयापीठाचे नांव, उत्तीर्ण झाल्याचे वर्ष, गुणांची टक्केवारी.

**क) आवश्यक कागदपत्रांच्या सांक्षांकित केलेल्या झेरॉक्स प्रती व मुळ कागदपत्र सोबत आणावे.**

१) शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे.

२) शाळा सोडल्याचा दाखला व जन्मतारखेचा दाखला.

३) अनुभवाचे प्रमाणपत्र.

४) 2 पासपोर्ट आकाराचे फोटो.

**ड) अर्जाची नोंदणी व छाननी मुलाखतीच्या दिवशीच करण्यात येईल व पात्र उमेदवारांच्या त्याच दिवशी मुलाखती घेण्यात येतील,**

१) मुलाखतीचा दिनांक :

२) स्थळः-. शिवनेरी सभागृह आरोग्य विभाग जि.प.पुणे

भरती प्रक्रिया स्थगित करणे किया रदद करणे/ अंशतः बदल करणे तसेच भरती प्रक्रियेसंदर्भातील संपूर्ण अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे जिल्हा परिषद पुणे यांनी स्वतःकडे राखून ठेपले आहेत. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारची तक्रार करता येणार नाही व कोणत्याही न्यायालयात जाता येणार नाही.

संतोष पाटील (भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**पुणे जिल्हा परिषद पुणे**